# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:11.08.2025** **वार:सोमवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांचं लोकार्पण, देशातल्या सर्वात लांब पल्ल्याच्या नागपूर-पुणे वंदे भारत गाडीचाही समावेश
2. देशातल्या 30 लाखांहून अधिक शेतकऱ्यांना आज केंद्रीय कृषी मंत्र्याच्या हस्ते पीक विम्याचे दावे वितरीत होणार
3. सायबर गुन्हेगारीच्या प्रतिबंधासाठी सर्वोत्तम तंत्रज्ञान महाराष्ट्राकडे असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन आणि
4. इगतपुरी इथं बेकायदा कॉल सेंटर सीबीआयकडून उद्ध्वस्त, पाच जणांना अटक

**<u>वंदे-भारत</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नागपूर-पुणे वंदे भारत एक्सप्रेस आणि बंगळुरू ते बेळगाव आणि अमृतसर ते कटरा माता वैष्णोदेवी या गाड्यांचं दूरस्थ पद्धतीनं उद्घाटन केलं. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या समारंभाला नागपूर रेल्वे स्थानकावर उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी माध्यमांशी संवाद साधला. विदर्भातून पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे, परंतु सध्या प्रवाशांना महागडी तिकिटे खरेदी करावी लागतात आणि खाजगी वाहनांनी प्रवास करावा लागतो. शिवाय, अशा प्रवासाला जास्त वेळ लागतो. या बाबी लक्षात घेऊन, ही रेल्वे सुरु केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

पुणे वंदे भारत एक्सप्रेस ही देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत एक्सप्रेस असून या रेल्वेगाडीमुळे नागपूर ते पुणे हे अंतर साधारण 12 तासांत पूर्ण करता येणार आहे. या गाडीला 10 थांबे देण्यात आले आहेत. सध्या अहिल्यानगरहून रेल्वे दौन्डला जाऊन नंतर पुण्याला जाते, पण नगर ते पुणे असा रेल्वेमार्ग तयार झाला तर वेळेची बचत होईल तसंच अंतर देखील कमी होईल, यासाठी मध्य रेल्वेच्या प्रमुखांशी सकारात्मक चर्चा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. ते म्हणाले......

**रेल्वे च्या authorities शी मी चर्चा केली आहे. आता नगरवरनं ट्रेन दौंड ला जाते, दौंड वरून पुण्याला जाते. एक प्रकारे शंभर सव्वाशे किलोमीटर डिरुटीन केलं जातं. आणि म्हणून मी त्यांना असं सुचवलंय की नगरवरनं जर थेट पुण्यापर्यंत आपण लाईन केली तर त्यातनं, आपल्या मोठ्या प्रमाणात, वेळही वाचेल आणि डिस्टन्स ही कमी होईल आणि त्या संदर्भात पुढच्या काळामध्ये रेल्वे मिनिस्ट्रीशी चर्चा करून त्यांच्या माध्यमातनं हेही काम आम्ही करतो आहोत. आमचा प्रयत्न असाही आहे. की आपण जो छत्रपती संभाजीनगरपासनं पुण्यापर्यंत नवीन एक्सप्रेसवे करतोय त्याच्याच राइट ओफ वे मध्ये आपल्याला जर ही रेल्वे करता आली तर नागपूर पुणे डिस्टन्स रेल्वेचं शंभर किलोमीटर पेक्षा आपल्याला कमी करता येईल त्यामुळे त्याही संदर्भात आज सकारात्मक चर्चा झाली आहे.**

या एक्सप्रेसचं शेगांव इथं केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत जल्लोषात स्वागत करण्यात आलं. या गाडीचं स्वागत करतांना मंत्री म्हणाले......

**शेगाव एक मोठं तीर्थक्षेत्र म्हणूनसुद्धा आणि विदर्भाची पंढरी म्हणूनसुद्धा आपल्या शेगावची खाती संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण देशभरामध्ये आहे आणि म्हणून खूप दूरवरून भक्तजन या ठिकाणी येत असतात आणि आज निश्चितच वंदे भारतचा स्टॉप आपल्या या शेगावला मिळाल्यामुळं या ठिकाणी येणारे प्रवासी असतील संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येणारा भक्तवर्ग असेल यांच्यासाठी निश्चितच हे एक आनंदाचा आजचा क्षण होता.**

प्रवाशांनीही या गाडीचं स्वागत केलं आहे. ही एक प्रातिनिधिक प्रतिक्रिया.....

**मी गजानन महाराजांचा भक्त आहे आणि हे वंदे भारत जी ट्रेन सुरू झाली, त्यामुळे वेळेची फार बचत होईल आहे. नागपूरवरून येणाऱ्या प्रवाशांना भाविक भक्तांना संतनगरीत येण्याकरिता त्यांचा बराच वेळ वाचेल आणि त्यांना दक्ष दर्शन घे घेऊन लवकरात लवकर आपल्या गावी नागपूरला परत जाता येईल परत त्यामुळे केंद्र सरकारनं जी ही गाडी सुरू केली नागपूर पुणे वंदे भारत आणि जो शेगाव या संतनगरीला थांबा दिला त्याबद्दल मी केंद्र सरकारचे खूप खूप आभार मानतो.**

या रेल्वेचं अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर काल जल्लोषात स्वागत करण्यात आलं. विधानपरिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे, खासदार निलेश लंके आणि रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**<u>पीकविमा-चौहान</u>**

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान आज राजस्थानातल्या झुंझुनू इथं एका कार्यक्रमात 30 लाखांहून अधिक शेतकऱ्यांना तीन हजार 200 कोटी रुपयांहून अधिक किमतीचे पीक विमा दाव्यांचं वाटप करणार आहेत. पंतप्रधान पीक विमा योजनेतल्या गेल्या वर्षीच्या खरीप आणि रब्बी हंगामातल्या दाव्यांची भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा केली जाणार आहे. पीएम किसान सन्मान निधी वाटपाच्या धर्तीवर प्रथमच एका कार्यक्रमातून नुकसानभरपाईचं वाटप होणार आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांना खरिपातल्या नुकसानभरपाईपोटी 809 कोटी तर रब्बीसाठी 112 कोटी असे एकंदर 921 कोटी रुपये मिळणार आहेत.

**<u>गरुड-दृष्टी</u>**

सोशल मीडियाद्वारे होणाऱ्या जातीय दंगलीच्या घटनांना आळा घालण्यासाठी राज्यात जगातली सर्वोत्तम यंत्रणा आणि तंत्रज्ञान उपलब्ध आहे. अशा व्यक्तींचा शोध घेण्यात आणि त्यांच्यावर त्वरित कारवाई करण्यात 'गरुड दृष्टी' ही साधने महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल नागपूरमध्ये म्हणाले. नागपूर पोलिस विभागाच्या वतीनं आयोजित 'गरुड दृष्टी' सोशल मीडिया मॉनिटरिंग आणि सायबर इंटेलिजेंस प्रकल्पाच्या सादरीकरणात ते बोलत होते. आर्थिक फसवणुकीला बळी पडलेल्यांचे सुमारे 10 कोटी रुपये यावेळी मुख्यमंत्र्यांनी पीडितांना सुपूर्द केले. आर्थिक फसवणुकीचा बळी पडल्याचं लक्षात आल्यानंतर नागरिकांनी लवकरात लवकर 1930 आणि 1945 या हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधावा, असं आवाहन फडणवीस यांनी केलं.

**<u>कारागृह-ग्रंथालयं</u>**

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान या कोलकाता इथल्या संस्थेकडून समान निधी योजने अंतर्गत राज्यातल्या 60 कारागृह ग्रंथालयांसाठी प्रत्येकी एक बुककेस आणि एक बुकरॅक देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

कारागृहातील वाचनाची संधी उपलब्ध होऊन त्यांच्यामध्ये वाचनाची आवड वाढावी आणि जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा, या विचारातून ग्रंथालय संचालनालयाच्या सहकार्यानं हे भेट कारागृहांना देण्यात येणार आहे.

**<u>दिशा-अभियान</u>**

बौद्धिक अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी दिशा अभियान राबवण्यात आलं असून एक नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम राज्यातल्या 453 विशेष शाळांमध्ये लागू झाला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. बौद्धिकरीत्या अक्षम असलेल्या विद्यार्थ्यांसाठी अश्या प्रकारचा अभ्यासक्रम राबवणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य आहे. राज्यातल्या सर्व शासकीय अनुदानित आणि विनाअनुदानित विशेष ओळखपत्र शाळांमध्ये हा अभ्यासक्रम राबविण्यात येतो. दिशा अभियान 453 शाळांमध्ये राबवण्यात येत असून यामध्ये सुमारे अडीच हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आलं आहे. या अभियानाचा थेट लाभ 18 हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना मिळाला आहे.

**<u>तिरंगा</u>**

हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत राज्यभरात विविध उपक्रम राबवले जात आहेत. या अभियाना अंतर्गत पनवेल महानगरपालिकेनं काल तिरंगा सायकल फेरीचं आयोजन केलं होतं; यात 300 पेक्षा जास्त सायकलस्वारांनी भाग घेतला. नांदेड महापालिकेच्या वतीनं देखील काल तिरंगा फेरी काढण्यात आली. महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या फेरीला सुरुवात झाली.

**<u>सीबीआय</u>**

केंद्रीय अन्वेषण विभाग, सीबीआयनं नाशिकमध्ये इगतपुरी इथं सुरु असलेलं  बेकायदा कॉल सेंटर काल उद्ध्वस्त केलं. या प्रकरणी सीबीआयनं मुंबईतल्या सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यातल्या पाच जणांना अटक केली आहे. बँक कर्मचाऱ्यांचासह काही अज्ञात व्यक्तींवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलिसांनी लॅपटॉप, मोबाईल फोन आणि अन्य डिजिटल सामग्री ताब्यात घेतली आहे. याशिवाय या ठिकाणी सुमारे 1 कोटी 20 लाख रुपयांची रोकड, 500 ग्रॅम सोनं, आणि सात गाडया जप्त केल्या. घटनास्थळी जवळपास 5 लाखापर्यंतची क्रिप्टोकरन्सीचे व्यवहार आणि दोन हजारापर्यंत कॅनेडिन डॉलर्सचे गिफ्ट व्हाउचर्स आढळले.

**<u>जव्हार-न्यायालय-पालघर</u>**

पालघर जिल्ह्यातल्या जव्हार इथं नव्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालय भवनाचं लोकार्पण काल करण्यात आलं. आदिवासी बहुल जव्हार तालुक्यातल्या नागरिकांना न्याय मिळवण्यासाठी आता लांब प्रवास करावा लागणार नाही, असा विश्वास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांनी या न्यायालयाच्या लोकार्पण समयी व्यक्त केला.

**<u>लम्पी-बुलडाणा</u>**

बुलडाणा जिल्ह्यात जनावरांमध्ये मोठ्या प्रमाणावर लंपी या त्वचा आजाराचा प्रादुर्भाव झाल्यामुळे जिल्ह्यात मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. देऊळगाव, मलकापुर, सिंदखेड राजा, खामगाव  चिखली ह्या तालुक्यातली गावं नियंत्रित क्षेत्रं म्हणून घोषित करण्यात आली आहेत. या भागात गुरांचे बाजार, जत्रा, वाहतूक यांच्यावर निर्बंध घालण्यात आले असून स्वच्छता, फवारणी, लस देण्याचे आदेश जिल्हा दंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जारी केले आहेत.

**<u>कोमसाप-सिंधुदुर्ग</u>**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सिंधुदुर्ग जिल्हा अध्यक्षपदाची सूत्र पुन्हा एकदा मंगेश मसके यांच्याकडे तीन वर्षांसाठी सोपविण्यात आली आहेत. कोमसापच्या जिल्हा कार्यकारिणीच्या काल कुडाळमध्ये झालेल्या सभेत हा निर्णय

घेण्यात आला. झाली. जिल्हा प्रतिनिधी म्हणून रुजारिओ पिंटो, कोषाध्यक्ष पदी अनंत वैद्य तर कार्यवाहपदी ॲड. संतोष सावंत यांची निवड करण्यात आली आहे.

**त्र्यंबकेश्वर-नाशिक**

नाशिक जिल्ह्यातल्या श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर इथं तिसऱ्या श्रावणी सोमवार निमित्तानं ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. नाशिकसह विविध स्थानकातून 270 जादा एसटी बस गाड्या सोडण्यात आल्या आहेत. त्र्यंबकेश्वर नगरपालिकेनं भाविकांसाठी विविध मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत तसंच पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे.

**हवामान**

राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भामध्ये पावसाची शक्यता वर्तवली आहे. तर तुरळक ठिकाणी ढगांच्या गडगडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार